नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५६/२०२१

निशाण क्रमांक ७३ / क सोबत

वादी तर्फे वकील एस. के. नंदगावे यांचे मार्फत प्रतिवादी क्रमांक १ तर्फे साक्षीदार क्रमांक ३ समीर बाबूराव तोडकर याचा उलट तपास सुरु

२. माझे शिक्षण १० वी पर्यंत झालेले आहे. माझे वडील सन २०१८ ला मयत झालेले आहेत. माझी जनाबाई बाबूराव तोडकर हयात आहे. तीचे माहेर हासुरचंपू आहे. तीच्या वडीलाचे नांव गणूसार आहे. संतोष हा माझा आत्तेभाऊ आहे. आमचे एकमेकाकडे येणे जाणे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्ही ऐकमेकांना अडीअडचणीत मदत करतो. हे म्हणणे बरोबर आहे की, संतोष ने मला साक्ष देण्याकरीता सांगीतले. हे म्हणणे बरोबर आहे की, संतोषने मला त्याच्या बाजूने साक्ष दया असे सांगीतले.

३. मी गट नंबर ३८२ चा सात बारा बघीतला आहे. त्यामध्ये अडीच एकर बारा गुंठे क्षेत्र आहे. एक महिन्या पूर्वीचा सात बारा मी बघीतला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सात बारामध्ये परशराम कांबळे, आनंदा इराप्पा कांबळे, धनंजय इराप्पा कांबळे, विमल इराप्पा कांबळे याची नावे सामाईकात आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याची वहीवाट सामाईका मध्ये आहे. दिनांक २७/४/२०१६ चे खरेदी पत्र मी बघीतलेले नाही. ते खरेदीपत्र मी आजपर्यत कधीही बघीतलेले नाही. सदरील खरेदीपत्रातील चतुसिमा बद्दल मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, खरेदीपत्राच्या अनुषंगाचा मजकूर जबाब तयार करताना मी सांगीतलेला नाही. तो मजकूर माझ्या शपथपत्रात का नमूद केला आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, खरेदीच्या तारेखस जमीन ही बागायत जमीन होती. हे म्हणणे खरे नाही की, संतोष ने जमीन ही शेती कामासाठी घेतली आहे. गट नंबर ३८३ चा सात बारा मी बघीतलेला नाही. गट नंबर ३८३ मध्ये पिक पाणी सदरी कोणाच्या नोंदी आहेत याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, गट नंबर ३८३ बद्दल मला व्यक्तीगत माहिती नाही. गट नंबर ३८३ बाबतचा मजकूर जबाब तयार करताना मी सांगीतला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, खरेदी खताबाबतचा व गट नंबर ३८३ बाबतचा मजकूर माझ्या जबाबात संतोष ने टाकलेला आहे. वादी व प्रतिवादी यांची नांवे मला सांगता येतात. हे म्हणणे खरे नाही

की, वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते ४ याच्या मध्ये वाटणी झाली आहे अथवा नाही याबाबत मला माहिती नाही. मला गट नंबर ३८२ च्या चतुसिमा सांगता येणार नाहीत. दावा मिळकत ते गावाचे अंतराची मी स्वता मोजदाद केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, संतोषने २०० मिटर सांगीतले मुळे मी ते जबाबत सांगीतले.

४. हे मला सांगता येणार नाही की, ग्रामपंचायतीतील सत्ता तेली गटाकडे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, ग्रामपंचायत, हासुरचंपू ही राजकीय वरदहस्त असलेली ग्रामपंचायत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, संतोष हा देखील राजकीय वरदहस्त असलेला व्यक्ती आहे. संतोष ची ग्रामपंचायत मध्ये उठ बस असते का हे मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब हा संतोषने तयार करुन ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माइया शपथपत्रातील मजकूर जो की, शेड बांधलेला आहे, लाईटची व्यवस्था केलेली आहे हा खोटा नमूद केलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते ४ याची वहीवाट आहे. मी गट नंबर ३८७ चा सात बारा आणलेला नाही व घराचा उतारा देखील आणलेला नाही. गट नंबर ३८७ मध्ये शेड व घर आहे हे दर्शविणरा पुरावा मी सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइयाकडे नाही म्हणून मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मध्ये प्रतिवादीची कधीही वहीवाट नव्हती व नाही. हे म्हणणे खरे नाही की, संतोषला मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०८/१०/२०२५ सही/

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज